



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २१०, शुक्रवार ३ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# भाजपाच्या पाठींब्याचे बुमरँग विजय औटींवर उलटले !

■ सर्व पदाधिकाऱ्यांकडून नीलेश लंके यांना पाठींब्याची घोषणा ■ नगर येथे जिल्हा प्रमुखांच्या उपस्थितीत बैठक ■ नीलेश लंके यांच्याशीही साधला संवाद

नगर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा खा. डॉ. सुजय विखे यांना पाठींबा देण्याच्या घोषणेचे बुमरँग माजी आमदार विजयराव औटी यांच्यावर उलटले आहे. तालुकाप्रमुखांसह पाचही पदाधिकाऱ्यांनी गुरूवारी नगर येथे पत्रकार परीषद घेउन आम्ही महाविकास आघाडीसोबतच असल्याचे स्पष्ट करून विजय औटी यांच्या निर्णयाशी आम्ही सहमत नसल्याची घोषणा पत्रकार परीषदेत केली.**

लोकसभा निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आ. नीलेश लंके यांना उमेदवारी घोषीत करण्यात आली. उमेदवारीच्या घोषनेनंतर जिल्हाप्रमुख शशीकांत गाडे, पक्षाचे संपर्कप्रमुख सुनील शिंदे, आ. नीलेश लंके यांच्यासह राष्ट्रवादीच्या काही पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून विजय औटी यांची भेट घेऊन प्रचारात सक्रिय होण्याची विनंती केली होती. त्यावेळी औटी यांनी योग्य वेळी प्रचारात सहभागी होण्याचा शब्द दिला होता. लंके यांचा अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित राहतो असेही त्यांनी सांगितले होते. प्रत्यक्षात ते अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित राहिलेच नाहीत.

या पार्श्वभुमीवर दोन दिवसांपूर्वी औटी यांनी तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, महिला आघाडीप्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेना तालुका प्रमुख अनिल शेटे, ज्येष्ठ नेते मा. पंचायत समिती सदस्य डॉ. भास्कर शिरोळे, उपजिल्हाप्रमुख रामदास भोसले यांची बैठक घेतली. या बैठकीत सर्वांनी उध्दव ठाकरे यांच्या आदेशानुसार महाविकास आघाडीच्या उमेदवारास मदत करण्याची भुमिका मांडली. त्यानंतर औटी यांनी आपण दोन दिवसांत निर्णय जाहिर करू असे स्पष्ट केले होते. बुधवारी रात्री औटी यांनी आपण सुजय विखे यांना पाठींबा देत असल्याचे सोशल मीडियावरून जाहिर केले. त्यानंतर तालुक्यात एकच खळबळ उडाली होती.

औटी यांच्या निर्णयानंतर जिल्हाप्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांनी तालुकाप्रमुखांसह इतर पदाधिकाऱ्यांशी संपर्क करून गुरूवारी नगर येथे त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे, महिला आघाडीप्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेनेचे तालुकाप्रमुख अनिल शेटे, डॉ. भास्करराव शिरोळे, डॉ. कोमल भंडारी, किसन सुपेकर, किसन चौधरी, अक्षय बेलोटे, गुलाबराव नवले, सखाराम उजागरे, बाबाजी तनपुरे, संदीप होले, शंकरराव पठारे, संदीप भंडारी, संतोष येवले, शिवाजी लाळगे, डॉ. रायचंद आढाव, अशोक सालके, संजय मते, सुभाष भोसले, रामदास खोसे, संतोष साबळे, संतोष लामखडे, शांताराम पाडळे, ज्ञानदेव खोसे, राजेंद्र मेहेर, संदीप सुपेकर, कुंडलीक पठारे,सुहास औटी, उमेश गायकवाड, मोहित जाधव, शरद घोलप आदी पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.



■ विजय औटी यांनी भाजपाला पाठींबा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाविरोधात भुमिका घेत महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना साथ देण्याची घोषणा पत्रकार परिषदेत केली.

## दोन्ही पक्ष समन्वयाने काम करणार

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके हे तालुक्यातीलच आहेत. विधानसभेला शिवसेना व राष्ट्रवादी पक्षात लढत झाली. त्यात लंके यांचा विजय झाला. तेंव्हापासून दोन्ही पक्षात संघर्ष सुरू होता. त्यासंदर्भात जिल्हाप्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांच्याकडे भावना मांडल्या. यापुढील काळात कोणालाही त्रास होणार नाही, दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते समन्वयाने काम करतील अशी ग्वाही शशिकांत गाडे, दादाभाऊ कळमकर तसेच आ. नीलेश लंके यांनी दिली आहे. यापुढील काळात राष्ट्रवादी, शिवसेना एकदिलाने काम करतील. सर्व निवडणूका एकत्र लढवून सत्तेमध्ये वाटा दिला जाईल याची ग्वाही देण्यात आली असून आम्ही हातात हात घालून निवडणूकीस सामोरे जाणार आहोत असे डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले.

## औटी यांनी परस्पर निर्णय घेतला

निवडणूकीसंदर्भात झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत महाविकास आघाडीस पाठींबा देण्याबाबत सर्वच पदाधिकाऱ्यांनी भूमिका मांडली होती. मात्र औटी यांनी विखे यांना पाठींबा देण्याचा निर्णय परस्पर जाहिर केला. त्यांनी कशा पध्दतीने निर्णय घेतला किंवा त्यामागे त्यांची काय अडचण होती याचीही कल्पना नाही.

डॉ. श्रीकांत पठारे
तालुकाप्रमुख

## पूर्वी औटी हेच निर्णय घ्यायचे

औटी यांनी परस्पर निर्णय कसा जाहिर केला या प्रश्नावर बोलताना डॉ. पठारे म्हणाले, पूर्वी औटी हेच निर्णय घेत असत. दोन पक्षांमधील संघर्षाबाबत वेळोवेळी औटी यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. आज आम्ही पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचाच आदेश मानणार असून महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाठीशी आम्ही उभे राहणार असल्याचे डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले.

## शिवसैनिकांना निर्णय मान्य नाही

विजय औटी यांनी बोलविलेल्या बैठकीस आम्ही उपस्थित होतो. सर्वांची भूमिका महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी ताकद उभी करण्याची होती. औटी यांनी घेतलेला निर्णय तमाम शिवसैनिकांना मान्य नसून तमाम शिवसैनिक महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे आहेत.

प्रियंका खिलारी
महिला आघाडी तालुकाप्रमुख

## संपर्कप्रमुखांना अहवाल देणार

औटी यांनी विरोधी उमेदवाराला पाठींबा देण्याचा निर्णय घेतला असून त्यांचा हा निर्णय पक्ष शिस्तीत बसणारा नाही. त्याबाबत पक्षाचे संपर्क प्रमुख सुनील शिदे यांना अहवाल पाठविण्यात आला असून तो अहवाल पक्षप्रमुखांपर्यंत गेल्यानंतर पुढील निर्णय जाहिर होईल.

शशिकांत गाडे
जिल्हाप्रमुख

## ठाकरे यांना त्रास देणाऱ्या पक्षाला आम्ही मदत करावी ?

औटी यांचा निर्णय शिवसेना पक्षप्रमुखांच्या आदेशाविरूध्द असून तो आम्हाला मान्य नाही. ज्या भाजपाने उध्दव ठाकरे यांना सर्वाधिक त्रास दिला त्या पक्षाच्या उमेदवाराला मदत करणे कडवट शिवसैनिक कधीही मान्य करणार नाही. औटी यांनी घेतलेला निर्णय आमच्या उपस्थितीत झालेला नाही. आमच्या स्वाभिमानाला धक्का लागेल असा हा निर्णय आहे. आम्ही महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे आहोत.

अनिल शेटे
तालुकाप्रमुख, युवा सेना

## आ. लंके यांच्यासोबत बैठक

शिवसैनिकांच्या बैठकीनंतर आ. नीलेश लंके यांनीही सर्वांशी संवाद साधला. शिवसैनिकांनी उपस्थित केलेल्या विविध भूमिकांबाबत जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांच्या समन्वयातून निर्णय घेण्यात येउन यापुढील काळात समविचाराने काम करण्याचा निर्धार करण्यात आला.

# लंकेंनी विखेंची पळता भुई थोडी केलीय!

## प्रभावती घोगरे यांची घणघाती टीका

सारोळा कासार : प्रतिनिधी

**विखे कुटूंबाकडे पन्नास वर्षापासूनची धनसंपत्ती आहे, ती हळूहळू बाहेर निघेल. कारण तुम्ही त्यांना पळता भुई केलेली आहे. ही निवडणूक एकतर्फी नाही ही जमेची बाजू असून नीलेश लंके हे देत असलेली टक्कर ही वाखाण्याजोगी गोष्ट आहे असल्याचे लोणी खुर्दच्या सरपंच प्रभावती घोगरे यांनी सांगितले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ चिचोंडी पाटील आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत घोगरे या बोलत होत्या. उर्वरीत पान ३ वर



■ नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ सारोळा कासार येथे लोणी खुर्दच्या सरपंच प्रभावती घोगरे यांची प्रचार सभा पार पडली.

## प्रवरेचे किती विद्यार्थी डॉक्टर झाले ?

प्रवरा मेडीकल ट्रस्टमध्ये कारखानाच्या सभासदांच्या मुलांना इंग्रजी माध्यम तसेच इतर शिक्षणाबरोबरच वैद्यकिय शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी सभासदांच्या पैशांतून, उसाच्या टनेजमागे पैसे काढून या शिक्षण संस्था उभ्या राहिल्या. समाजसेवेच्या माध्यमातून लोकांना या संस्थांचा उपयोग व्हावा हा त्यामागे हेतू होता. परिसरातील लोक या संस्थांमध्ये विश्वस्त होते. विखे यांच्याकडे आम्ही या संस्था विश्वासाने दिल्या. जसे आम्ही तसे ते शेतकरी. काळाच्या ओघात त्यांनी इतर विश्वस्तांना हुसकावून लावले व खाजगी संस्थेप्रमाणे या संस्था ताब्यात घेऊन आपल्या कुटूंबियांमध्ये वाटून घेतल्या. सभासदांच्या मुलांकडूनही या संस्थांमध्ये डोनेशन घेतले जाते. प्रवरा परीसरातील किती मुले डॉक्टर झाले आणि बाहेरचे डोनेशन देउन कीती डॉक्टर झाले याचा हिशेब तुम्हीच करा.

प्रभावती घोगरे

## विरोधकांच्या संस्था बंद पाडण्याचा उद्योग

आपला माणूस कोण हे ओळखा. आमच्याकडच्या सगळ्या सहकारी संस्था त्यांनी बंद पाडल्या. फक्त विरोध. विरोधासाठी विरोध. बाभळेश्वर दुध संघ, मुळा प्रवरा, सुतगिरणी, खरेदी विक्री संघ या विरोधकांच्या ताब्यातील संस्था बंद पाडणे हाच उद्योग. त्यांच्या हट्टापाई लोकांच्या प्रपंचावर नांगर फिरविण्याचे काम केले जात असल्याचा आरोप घोगरे यांनी केला.

## त्यांनी उत्तरेचा कारभार पहायचा की दक्षिणेचा ?

सरकार यांचे, सगळी पदे यांच्याच घरात. भाजपाकडे दुसरे कोणी नव्हते का ? आमच्याकडे उमेदवार न्यायला आले ? १९ लाख लोकांमध्ये एकही कर्तबगार, ज्याच्यावर भरवसा ठेउन दिल्लीला पाठवावा असा माणूसच सापडला नाही का ? थेट लोणीला येउन धडकले । त्यांच्यावर कमी लोड आहे का ? लोणीचे पहायचं, शिर्डी मतदारसंघाचं पाहायचं, वडील आमदार, जिल्हा परीषद त्यांच्याच ताब्यात. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर ऐव्हडा लोड द्यायचा नाही ना. त्यांनी उत्तरेचा कारभार पाहायचा की दक्षिणेचा पहायचा असा उपरोधिक सवाल घोगरे यांनी केला.

## आपलं कोण व लबाड कोण हे ओळखा

मध्यंतरी दिल्लीला भेटायला गेल्यानंतर कांद्याची निर्यात बंदी उठल्याचे सांगितले गेले. सत्कारही घेतले. दोन दिवसानंतर सचिवाने सांगितले की निर्यात बंदी उठलेली नाही. आपलं कोण व लबाड कोण हे ओळखायला शिका असे आवाहन घोगरे यांनी केले.

## उसाचे पेंमेट द्या मग स्टेटस ठेवा

आमच्या भागातील त्यांचे कार्यकर्ते ४५ डिग्री तापमानात दक्षिणेत फिरत आहेत. इतकी हिंमत होती ना अगोदर उस न्यायचा, पेमेंट द्यायचे मग मोबाईलवर स्टेटस ठेवायचे. त्यानंतरच गप्पा मारायच्या असा टोला घोगरे यांनी उत्तरेतील कार्यकर्त्यांना लगावला.

## नवरीचे शॉपींग ६० लाखांचे होतेय !

काल बातमी ऐकली की साठ हजार रूपये सापडले. साठ हजार म्हणजे साठ लाख रूपये आहेत का ? साठ लाखाचं नवरीच्या लग्नाचं शॉपींग होतंय. ३० हजार रूपये ब्युटीपार्लरला लागतात. साठ हजाराचा डांगोरा पिटण्याची काय गरज होती. तुमचे कोटीने खर्च. दुसऱ्यावर बोट ठेऊन रडीचा डाव सुरू केला असल्याचे घोगरे म्हणाल्या.

## ग्रामिण भागाची यांना काय जाण ? फक्त भुलथापा आणि आश्वासने

ग्रामिण भागाची यांना काय जाण आहे ? हे जन्मतः सोन्याचा चमचा तोंडात घेउन आलेले आहेत. सरपंच नाही किंवा काही नाही थेट खासदार, डायरेक्ट दिल्ली !लोकांना फक्त भुलथापा आणि आ श्वासने याव्यतिरिक्त काहीच नाही. कांदा,दुध, सोयाबिनला भाव नाही त्याविषयी ते बोलत नसल्याचे घोगरे म्हणाल्या.

## चौथी पिढी आली, निळवंडेचे पाणी का आले नाही ?

चौथी पिढी सुरू झाली. का निळवंडेचे पाणी ग्रामीण भागात आले नाही ? पाच वर्षात दक्षिणेत का कामे झाली नाहीत ? नगर-मनमाड रस्ता पहा. तुमच्याच मतदारसंघातील छोटया छोटया गोष्टी करता येत नाहीत. मोठया मोठया गोष्टी करून फक्त लोकांना भुलविण्याचे काम केले जात असल्याचा आरोप घोगरे यांनी केला.

## मतदानाला जाताना मेंदू ठिकाणावर ठेवा

आम्ही सुसंस्कृत आहोत, शिक्षित आहोत. असे सांगितले जाते. मलाही वाटले होते, मराठीत बोलू की इंग्रजीत बोलू ! तुम्हाला अमिषे दाखविली जातील. जे शक्य आहे ते केले जाईल. खा, प्या, मौजमजा करा परंतू मतदानाला जाताना मेंदू ठिकाणवर ठेवा. विचार करून मतदान करा. गेलेली संधी पुन्हा येणार नाही असे घोगरे यांनी सांगितले.





Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS 2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



# चंदेरी

छोट्या पडद्यावरील मालिकांमुळे अनेक कलाकार घराघरांत लोकप्रिय होतात. 'माझी तुझी रेशीमगाठ', 'का रे दुरावा', 'रमा राघव' अशा गाजलेल्या मालिकांमध्ये खलनायिकेची भूमिका साकारणाऱ्या शीतल क्षीरसागरने आज प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. नुकत्याच स्टार मीडिया मराठीला दिलेल्या मुलाखतीत शीतलने तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत खुलासा केला आहे.

## लग्नामुळे शीतलला लोक मारतात टोमणे!

लग्न झालेलं नाही. त्यामुळे लोक टोमणे मारतात, असं अभिनेत्रीने या मुलाखतीत सांगितलं. शीतल म्हणाली, लग्नाबद्दल प्रश्न विचारणं साहजिक आहेत. आयुष्य हे प्रत्येकासाठी सारखं नसतं. तुमच्या फूटपट्टीने इतरांचं आयुष्य तोलू मापू शकत नाही. हा माझा प्रवास आहे, मी एन्जॉय करते आहे. बरेचजण असे प्रश्न विचारतात. अनाहूत सल्ले देतात. इकडतिकडची स्थळं सुचवतात. मला राग येत नाही. शीतल म्हणाली, रस्त्यात आजीबाई विचारतात, तेव्हा मी सांगते, माझं अजून लग्न झालेलं नाही. तेव्हा त्या आजीबाईंना प्रश्न पडतो. अरे तुझं का लग्न झालं नाही? इतकी छान दिसतेस, मग का नाही झालं. आपले ठोकताळे असतात. तसं घडत नसलं की धक्का बसतो. समोरच्यामध्ये काहीतरी कमी आहे असं नसतं. अमुक वयात शिक्षण पूर्ण करा, मग नोकरी करा. मग लग्न करा. मूलबाळ असा ठरलेला पॅटर्न आहे. घर-फार्महाऊस-विदेशवारी. हे ठोकताळे आहेत. सगळ्यांचं आयुष्य तसं नसतं. तुम्ही त्यांच्या नजरेत अपयशी ठरता. माझ्यासारख्या अनेकजणी आहेत, अनेकजण आहेत. नाराज-निराश व्हायचं कारण नाही. मी माझी कंपनी एन्जॉय करते. हा लोनलीनेस नाही, हा सॉल्टिट्यूड आहे, असं मत शीतलने मांडलं.



## गर्भवती असूनही दीपिका पदुकोण करतेय शूटींग!



**लवकरच आई होणारी अभिनेत्री दीपिका पदुकोण नुकतीच 'सिंघम अगेन'च्या सेटवर दिसली. 'गुड न्यूज' दिल्यानंतर पहिल्यांदाच दीपिकानं तिचं बेबी बंप दाखवलं. आगामी चित्रपटासाठी ॲक्शन सीक्वेन्सचं शूटिंग करण्यासाठी अभिनेत्री पोलिसांच्या गणवेशात सेटवर आली होती. याचे फोटोज सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.**

पोलिसांचे खाकी कपडे, केसांचा बन, डोळ्यांवर ग्लासेस अशा लूकमध्ये अभिनेत्री सेटवर सज्ज झाली होती. दीपिकाने एक सीन शूट केला. ज्यामध्ये गुंडांच्या पोशाखात अनेक पुरुष होते. हाय वेस्ट पॅन्ट आणि मोठा बेल्ट लावून अभिनेत्रीनं बेबी बंप लपवण्याचा प्रयत्न यात केला गेला आहे, असं दिसतंय. दीपिका पदुकोणच्या फॅन पेजेसवरून हे फोटोज शेअर झाले होते. या फोटोजमध्ये दीपिकाच्या फाईट सीन्सपूर्वी अभिनेत्री दिग्दर्शक रोहित शेट्टी आणि स्टंट टीमच्या सदस्यांकडून सूचना घेताना दिसते आहे. दीपिका प्रेग्नंट असल्यानं तिच्या फायटिंगचे सीन ती करणार नसून, तिच्याऐवजी स्टंट्स करणारी दुसरी व्यक्ती असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. शूटिंगच्या ठिकाणी दीपिकासारखेच कपडे आणि हेअरस्टाईल असणारी व्यक्ती तिथे उपस्थित होती. तेव्हा दीपिकाचं शूटींग सुरू होतं.

'सिंघम अगेन' चित्रपटाद्वारे दीपिका पहिल्यांदाच पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात शक्ती शेट्टी ही भूमिका साकारत लेडी सिंघम म्हणून दीपिका रोहित शेट्टीच्या पोलिसी संघात सामील झाली आहे. 'सिंघम अगेन'चं चित्रीकरण गेल्या वर्षी हैदराबादमध्ये सुरू झालं. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन' १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दीपिका पदुकोणसह या चित्रपटात अजय देवगण, रणवीर सिंग, करीना कपूर-खान, अक्षय कुमार व टायगर श्रॉफ हे कलाकार मुख्य भूमिकांत झळकणार आहेत.

## प्रार्थना बेहेरेला नकोय मूल, कारण...

**'मितवा', 'कॉफी आणि बरंच काही' या चित्रपटांमुळे अभिनेत्री प्रार्थना बेहेरे घराघरांत लोकप्रिय झाली. मोठ्या पडद्यावर पदार्पण करण्याआधी तिने अनेक हिंदी मालिकांमध्ये प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. 'पवित्र रिश्ता' सारख्या गाजलेल्या मालिकेत प्रार्थनाने महत्त्वाची भूमिका साकारली होती. अभिनय क्षेत्रात जम बसवल्यावर अभिनेत्रीने २०१७ मध्ये अभिषेक जावकरबरोबर लग्न केलं.**

लग्नानंतर प्रार्थनाने काही काळ मनोरंजनविश्वातून ब्रेक घेतला होता. परंतु, त्यानंतर 'माझी तुझी रेशीमगाठ' या लोकप्रिय मालिकेतून प्रार्थनाने छोट्या पडद्यावर मोठ्या दणक्यात पुनरागमन केलं. यामध्ये तिच्याबरोबर श्रेयस तळपदे, बालकलाकार मायरा वायकुळ यांच्या प्रमुख भूमिका होत्या. 'माझी तुझी रेशीमगाठ'मुळे प्रार्थनाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात वाढला. मालिकेने निरोप घेतल्यावर प्रार्थना आपला नवरा आणि सासरच्या मंडळींबरोबर अलिबागला शिफ्ट झाली. त्याठिकाणी तिने कुत्रे, मांजरी, घोडे असे अनेक प्राणी पाळले आहेत. याबाबत प्रार्थनाने नुकत्याच 'दिल के करीब'ला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केलं आहे. काही महिन्यांआधी अभिनेत्रीने तिच्या युट्यूब चॅनेलच्या माध्यमांतून मूल होऊ न देण्याबद्दल भाष्य केलं होतं. आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत प्रार्थनाने या वैयक्तिक आयुष्यात घेतलेल्या या निर्णयामागचं कारण सांगितलं आहे. अभिनेत्री म्हणते, माझ्या नवऱ्याला आणि मला प्राणी खूप आवडतात. त्यामुळे आम्हाला मूल नको असं आम्ही ठरवलं होतं. आता आमच्या घरी जे प्राणी आहेत ते सगळे एकूण एक प्राणी आमची मुलं आहेत आणि आम्ही दोघंही त्या सगळ्यांची खूप जास्त काळजी घेतो, त्यांना सांभाळतो. मूल होऊ न देण्याचा निर्णय मोठा होता पण, यात आमच्या घरच्या दोन्ही कुटुंबांनी आम्हाला पाठिंबा दिला, समजून घेतलं. माझे सासू-सासरे, आई-बाबा दोन्ही कुटुंबांनी हा निर्णय आमच्यावर सोडला होता. माझ्या नवऱ्याचं प्राण्यांवर प्रचंड प्रेम आहे. एका कुत्र्याला जरी काही झालं तरी आम्ही दोघंही बैचेन होतो. त्या मुक्या जनावराला आपली जास्त गरज आहे त्यामुळे त्यांच्यासाठी जगूया असा विचार आम्ही केला, असं प्रार्थनाने सांगितलं. दरम्यान, गेल्या वर्षभरापासून प्रार्थना तिचा नवरा अभिषेक आणि सासरच्या कुटुंबीयांबरोबर अलिबागला राहते. त्याठिकाणी त्यांचं आलिशान घर आहे. याशिवाय अभिनेत्रीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर लवकरच ती 'बाई गं' या चित्रपटात अभिनेता स्वप्नील जोशीबरोबर महत्त्वाची भूमिका साकारणार आहे.



## मंगळसूत्र घालण्याबद्दल क्षिती स्पष्टच बोलली!

**अभिनेत्री क्षिती जोगनं मालिका, नाटक, चित्रपट आणि वेब सीरिज या चारही माध्यमातून आपल्या दमदार अभिनयाचा ठसा उमटवला आहे. फक्त मराठीतच नाही तर हिंदी सिनेसृष्टीत क्षितीनं एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या करण जोहर दिग्दर्शित 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' चित्रपटातील तिच्या भूमिकेचं खूप कौतुक करण्यात आलं होतं. त्यानंतर क्षिती 'झिम्मा २' चित्रपटात पाहायला मिळाली. आपल्या सहसुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी क्षितीनं नुकतंच एका मुलाखतीमध्ये मंगळसूत्र घालण्याबाबत स्पष्ट मत मांडलं. क्षिती एका कार्यक्रमात सहभागी झाली होती. या कार्यक्रमात तिने लग्नानंतरचा एक किस्सा सांगितला.**

क्षिती म्हणाली, की मी कुठेतरी गेले होते. तेव्हा मी मंगळसूत्र घातलं नव्हतं. लग्नानंतर एक-दीड वर्षातील ही गोष्ट असेल. तू मंगळसूत्र नाही घातलं? तुझं नुकतंच लग्न झालंय ना?, असं विचारायला लागले. म्हटलं, त्याला माहितीये ना मी त्याची बायको आहे आणि मला माहिती आहे ना तो माझा नवरा आहे. तुला माहीत असो किंवा नसो. मला काय फरक पडतोय. म्हणजे ते घातल्याने काय होणार आहे? मला मंगळसूत्र खूप आवडतं. तो खूप सुंदर दागिना आहे, असं माझं मत आहे. पण ते माझ्या मनावर आहे. पण मी हे तुमच्यासाठी करत नाही. मी माझ्यासाठी करते. मला माहिती आहे. माझं लग्न झालंय. मंगळसूत्र घातलं काय किंवा न घातलं काय. मग या ज्या गोष्टी आहेत ना, ते त्याला (नवऱ्याला) नाही विचारत? की अरे तुझं लग्न झालंय ती मुलगी किती छान दिसते असं का म्हणालास तू? असं नाही होतं ना म्हणजे तो सहज गप्पा मारतो ना. अरे ही किती छान दिसते, ते चालतं. तर असे बोर लोकं असतात. त्यांना माझ्या मते वेल्ला टाइम असतो वेल्ला. घरी वेळीच लहानपणी आईने फटके नाही घातले ना. मला तर नेहमी असं वाटतं, आईने वेळीच धपाटे घालते असते ना तर ही वेळ नसती आली, असं क्षिती म्हणाली.




## वल्लरी विराजचं शिक्षण किती?

'झी मराठी' वाहिनीवर १८ मार्चपासून 'नवरी मिळे हिटलरला' नवी मालिका सुरू झाली. आज या मालिकेला एक महिना पूर्ण होतं आहे. अभिनेता राकेश बापट व अभिनेत्री वल्लरी विराज यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेने अल्पावधीत प्रेक्षकांच्या मनात घर निर्माण केलं आहे. अशातच लीला म्हणजे वल्लरी विराजने चाहत्यांशी संवाद साधला आणि चाहत्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.



वल्लरी विराजने इन्स्टाग्रामवरील 'आस्क मी सेशन'द्वारे चाहत्यांनी संवाद साधला. या वेळी चाहत्यांनी तिला आवडणाऱ्या कलाकारापासून ते तिचं शिक्षण असे अनेक प्रश्न विचारले. तिला एकदा चाहत्याने विचारलं की, तुझा आवडता कलाकार कोणता? ज्याबरोबर तुला काम करायला आवडेल ते तुझं स्वप्न आहे. यावर वल्लरीने अभिनेत्री मुक्ता बर्वेचा फोटो शेअर करून उत्तर दिलं. त्यानंतर अभिनेत्रीला आवडत्या सहकलाकारांविषयी प्रश्न विचारला. तेव्हा वल्लरीने सांगितलं, रेवू म्हणजे अभिनेत्री आलपिनी निसळ आणि मावशी आई म्हणजेच अभिनेत्री शितल क्षीरसागर हे दोन सहकलाकार वल्लरीला आवडतात. वल्लरीला तुझं शिक्षण काय? असा देखील एका चाहत्याने प्रश्न विचारला. यावर वल्लरी म्हणाली, BFM Graduate (बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट्स, Bachelor of Financial Markets) दरम्यान, वल्लरीने 'नवरी मिळेल हिटलरला' मालिकेपूर्वी बऱ्याच मालिका व चित्रपटात काम केलं आहे. तिने तिच्या अभिनयाचा ठसा हिंदीत उमटवला आहे. गेल्या महिन्यात तिचा 'कन्नी' चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात वल्लरीच्या सोबतीला हता दुर्गुळे, शुभंकर तावडे, अजिंक्य राऊत हे कलाकार होते.



## लग्नाआधी काशी विश्वनाथच्या दर्शनाला पोहोचली आरती सिंह

**गोविंदाची भाची व लोकप्रिय अभिनेत्री आरती सिंह २५ एप्रिल रोजी लग्नबंधनात अडकणार आहे. तिच्या लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. ३९ वर्षांची आरती आपल्या आयुष्यातील नवीन प्रवासासाठी खूप उत्सुक आहे. तिने लग्नाच्या एका आठवड्याआधी काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन घेतले.**


कॉमेडियन व अभिनेता कृष्णा अभिषेकची बहीण आरती सिंह बिझनेसमन दीपक चौहानशी लग्न करतेय, तो नवी मुंबईचा आहे. काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन घेऊन तिने लग्नाची पत्रिका मंदिरात ठेवली व देवाचे आशीर्वाद घेतले. 'इन्स्टंट बॉलीवूड'ने शेअर केलेल्या फोटोंमध्ये आरती लाल रंगाच्या साडीत दिसत आहे. ती मंदिरात पत्रिका हातात घेऊन उभी आहे. पत्रिकेत मोठ्या अक्षरात लिहिलेली तिची व दिपकची नावं दिसत आहेत. आरती सिंहने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यात तिचं सजलेलं घर पाहायला मिळतंय. घर आकर्षक विद्युत रोषणाने सजवल्याचं फोटोत दिसतंय. लग्नाला आता १० दिवस बाकी आहेत, असं कॅप्शन आरतीने या फोटोला दिलं आहे. आरती व दीपक यांचं अरेंज मॅरेज आहे. ते गेल्या वर्षी जुलैमध्ये भेटले होते. त्यानंतर त्यांनी एकत्र वेळ घालवला आणि लग्न करण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्रीने काही दिवसांपूर्वीच तिच्या लग्नाची तारीख जाहीर केली.

## वयाच्या 15 व्या वर्षीच विद्या बालन पडली प्रेमात!

**आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'दो और दो प्यार' येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली.**

नुकत्याच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं.

मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला. पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला



फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला. चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं. दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित 'दो और दो प्यार' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## शॉर्ट न्यूज

### नेवासा-राहुरी एसटी सेवा बंद; प्रवाशांचे हाल

**नेवासा :** रा.प.महामंडळाच्या नेवासा आगाराने नेवासा-राहुरी बसेस बंद केल्याने राहुरी-सोनई-घोडेगाव येथे येणाऱ्या प्रवाशांचे हाल होत असून तातडीने या बसेस सुरू करण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. या बस बंद करण्यामागे नेमके कारण काय आहे हे जाणण्याची उत्सुकता सर्वसामान्य प्रवासी वर्गाला लागली आहे. या मार्गावर जगप्रसिद्ध असे शनिशिंगणापूरचे देवस्थान असल्याने येथे येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. मात्र, बस बंद झाल्याने राज्यासह परराज्यातून येणाऱ्या भाविकांना मोठ्या त्रासाला तोंड द्यावे लागत आहे.

### श्रीरामपूर शहरामध्ये तलवारीसह तरुण ताब्यात

**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड क्रमांक एकमधील न्यायालयाच्या परिसरात तलवारीसह एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. रात्री एक वाजेच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली. बाळासाहेब मिलिंद देवरे (वय ३०) असे तरुणाचे नाव आहे. अंधारात एका कोपऱ्यात तलवार घेऊन दबा धरून तरुण बसलेला होता. त्याची झडती घेतली असता पोलिसांनी तलवार मिळून आली. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### दारुची वाहतूक करणारे दोघेजण गजाआड

**राहुरी :** गोरक्षनाथ मोहन देठे व दगडू पाराजी वाणी दोघे रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी, हे तरुण राहुरी येथे विनापरवाना बेकायदेशीररित्या चारचाकी वाहनातून विक्री करण्याच्या उद्देशाने देशी-विदेशी दारूची वाहतूक करताना मिळून आले. पोलिस पथकाने त्यांच्या ताब्यातून दारु व चारचाकी वाहन असा एकूण ५ लाख २२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राहुरी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास हवालदार राहुल यादव हे करीत आहेत. सदरची कारवाई पो. नि. संजय आर ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने केली.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळा संपन्न

**संगमनेर :** समाजाच्या विकासासाठी शिक्षण क्षेत्र हे अत्यंत महत्त्वाचे असून आधुनिक काळाबरोबर शिक्षण व्यवस्थाही बदलली पाहिजे कौशल्यपूर्ण शिक्षण आणि उत्तम शैक्षणिक दर्जा होण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. यशोधन मिठारे यांनी केले. संगमनेर येथील थोरात महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. प्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

### शेवगाव तालुक्यातील अपहृत मुलींची सुटका

**शेवगाव :** दहा दिवसांपूर्वी शेवगाव तालुक्यातील चेडे चांदगाव येथून अपहरण झालेल्या तिनही अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात अहमदनगरच्या स्थानिक गुन्हे शाखेला अखेर यश आले आहे. गावातील पोपट उर्फ पोपट्या शहादेव बोरुडे याने पाटलाच्या घरी देवीचे व्रत असल्याचे खोटे कारण पुढे करून तेथे जेवणासाठी घेवून जात असल्याचे सांगत फिर्यादीच्या दोन मुलींसह शेजारी राहणाऱ्या अन्य एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केले होते. या घटनेनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती.

# देशातील लोकांच्या मनात मोदीच!

## खा.डॉ.सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन



**कर्जत : प्रतिनिधी**

**ही देशाची निवडणूक असून देशाचा पंतप्रधान ठरविणारी निवडणूक आहे यामुळे शेवटचा मतदार महत्वाचा आहे. त्यापर्यंत पंतप्रधान मोदींचे कार्य पोहचवा असे आवाहन खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. पंतप्रधान मोदींनी राबविलेल्या योजनेचा लाभ सर्व घटकांना झाला आहे. यामुळे देशातील लोकांच्या मनात मोदीच आहेत. आपल्याला फक्त मतदाराला मतदान केंद्रापर्यंत पोहचवायचे आहे. असे त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितले. ते कर्जत येथील गाव भेट दौऱ्यादरम्यान बोलत होते.**

अहिल्यानगर लोकसभेची निवडणूक अंतिम टप्प्यात आली असताना महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांनी आपल्या प्रचाराची गती वाढवली आहे. गावो गावी भेटी देऊन, ते लोकांना देशाचा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदीच योग्य पर्याय असल्याचे मतदारांना समजावून सांगत आहेत. विकास कामाच्या मुद्यावर त्यांनी आपल्या प्रचार कायम ठेवला आहे. कर्जत तालूक्यातील माळंदी येथील गावात महायुतीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्यासह आमदार प्रा. राम शिंदे आणि इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना खा. डॉ. विखे म्हणाले की, सदरची निवडणूक विरोधकांनी अतिशय खालच्या पातळीवर आणली आहे. विकास कामा व्यतिरिक्त इतर सर्व मुद्यांवर ते काम करत आहेत. कारण त्यांच्याकडे सांगायला काहीच नाही. केवळ आरोप करून निवडणूकीत प्रसिद्धी मिळवण्याचे काम त्यांनी चालवले आहे. यामुळे जनतेची प्रचंड नाराजी दिसून येत आहे. १३ मे रोजी त्यांना मतदार आपली जागा दाखवतील टोला हाणला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मोदी सरकारने दोन पर्वात देशात असंख्य विकास कामे केली आहे. मागील १० वर्षात देशात झालेला विकास जनतेला माहित आहे. यामुळे मोदींच्या हमीवर लोकांचा विश्वास आहे. यामुळे आपल्याला केवळ मतदानाचा टक्का वाढवून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करायचे आहे असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

यावेळी प्रा. राम शिंदे यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राम शिंदे म्हणाले की, डॉ. सुजय विखे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे शिलेदार असून त्यांना विजयी करणे हे महायुतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे आद्य कर्तव्य आहे. आपला विजय नक्कीच होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांचे शुक्रवारी उपोषण

## ठेवीदारांनी सहभागी होण्याचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**संचालक आणि कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करून ठेवीदारांना पैसे परत करावेत, आदी मागण्यांसाठी नगर अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांकडून शुक्रवार (ता. ३) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे, या आंदोलनात जास्तीत-जास्त ठेवीदारांनी सहभागी होण्याचे आवाहन बँक बचाओ संघर्ष समितीचे डी. एम. कुलकर्णी यांनी केले आहे.**



यापूर्वी शासन दरबारी अनेक वेळा चर्चा झाल्या आहेत. मात्र, त्याचा कोणताही परिणाम दिसत नाही. त्यामुळे ठेवीदारांनी आपली व्यथा या आंदोलनाच्या माध्यमातून मांडावी. त्यामुळे आंदोलनास सहभागी होऊन ठेवीदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

### लंकेंनी विखेंची पळता भुई थोडी केलीय!

प्रवरेच्या कुठल्याही भुलथापांना बळी न पडता लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे रहण्याचे अवाहन करतानाच मागच्या निवडणूकीत साकळाईचे पाणी आणतो असे म्हणाले होते. त्यांनी आणले का पाणी ? ते लोकसभेच्या निवडणूकीसाठी तुमच्या आमच्यासाठी नव्हे तर स्वतःच्या स्वार्थासाठी उभे आहेत. स्वतःचे अस्तित्व टिकले पाहिजे, स्वतः मोठे झाले पाहिजे हेच विखे कुटूंबाचे राजकारण असल्याची घणाघाती टीका घोगरे यांनी केली.

घोगरे पुढे म्हणाल्या, स्थानिक असलेले नीलेश लंके यांना कधीही फोन करा ते तुमच्यासाठी रात्री अपरात्रीही धावत येतील. आमचे प्रवरेचे पाहुणे तुमच्या रस्त्याला कधी येतील ? कधी तुम्ही फोन करणार ? शिवाय नगर-मनमाड हायवे इतका जोरात आहे की त्यांना येण्यासाठी कीती तास लागतील ? घरचा, स्थानिक तो स्थानिक असतो.

घोगरे पुढे म्हणाल्या, प्रवरा भागात अतिशय दबाव तंत्राचा, हुकूमशाहीचा वापर करण्यात येतो. आम्ही ज्यावेळी सोसायटी व ग्रामपंचायत निवडणूक जिंकलो त्यावेळी आमच्या गावातील प्रत्येक नागरीकावर बारीक लक्ष ठेण्यात येते. आम्ही कुठे बसतो, संध्याकाळच्या वेळेस आमच्या घरातील कुटूंबिय एखाद्या दुकाणात बसले तर लगेच त्यांना निरोप येतो. तुझ्या दुकानात कसे बसले ? तुझे दुकान बंद करतो. गावात कुठे उठ बस करायची हे ठरविण्याचा अधिकार लोकशाहीने त्यांना दिला आहे का असा सवाल घोगरे यांनी केला.

# 3 लाखांची लीड म्हटले की, गडी थंड होतो

## ■ कृपया कुणीही लीड घेण्याच्या गप्पा हाणू नका
## ■ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचा सल्ला

**शिर्डी : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत सर्वच पक्षांचे नेते लाखोंच्या लीडने विजयी होण्याचा वलग्ना करत असताना काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी आपल्या नेत्यांना लीडच्या गप्पा न हाणण्याचा सल्ला दिला आहे. या प्रकरणी त्यांनी लीडच्या गप्पा हाणल्यामुळे आमचे उमेदवार थंड पडत असल्याची मिश्किल टिप्पणी केली आहे.**



बाळासाहेब थोरात यांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार भाऊसाहेब वाघचौरे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. त्यात त्यांनी कार्यकर्त्यांना ३ लाखांच्या लीडच्या गप्पा न हाणण्याचा सल्ला दिला. थोरात म्हणाले की, महाविकास आघाडीच्या उमेदवाराला संगमनेरमधून लीड देण्याची जबाबदारी आमच्या कार्यकर्त्यांची आहे. पण कुणीही आम्ही ३ लाखांच्या मताधिक्याने निवडून येऊ असे म्हणू नका. कारण आपल्याला लढावे लागणार आहे.

आमचा गडी जास्त पळत नाही

३ लाखांची लीड म्हटले की, आमचा गडी थंड होतो. जास्त पळत नाही. त्यामुळे वाघचौरे गैरसमजात राहू नका. आमच्यावर कृपा करा. तुम्ही निश्चितच निवडून येणार. पण मतदारांना आणखीन समजावून सांगावे लागेल. त्यामुळे कुणीही ३ लाखांची चर्चा करू नका, असे बाळासाहेब थोरात आपल्या नेत्यांचे कान टोचत म्हणाले.

बाळासाहेब थोरात पुढे बोलताना म्हणाले की, महाविकास आघाडीच्या जागावाटपात शिर्डीची जागा शिवसेनेच्या वाट्याला गेली. त्यामुळे मी या जागेसाठी भांडलोच नाही असा काहींचा गैरसमज झाला. पण शिवसेनेने आमच्या १४ खासदारांच्या जागा आमच्याच हा पक्का निर्धार केला होता. एक कोल्हापूरची जागा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांसाठी सोडली. त्यानंतर आमची सांगली गेली. त्यामुळे खासदार शिवसेनेचा असला तरी पाठिंबा काँग्रेसचाच असेल. मला राज्यातील अनेक ठिकाणांहून सभांसाठी बोलावण्यात येत आहे. आपल्याला चांगली डिमांड आहे, असे थोरात म्हणाले.

यशपाल भिंगेंचीही महायुतीवर टीका

नांदेडचे महाविकास आघाडीचे नेते यशपाल भिंगे यांनीही यावेळी महायुतीवर निशाणा साधला. यशपाल भिंगे म्हणाले की, २०१९ च्या निवडणुकीत माझ्यामुळेच नांदेडला भाजपचा खासदार निवडून आला. पण यावेळी मी त्याच्याविरोधात शड्डू ठोकून उभा राहिलो आणि माझ्यामुळे निवडून आलेल्याला पाडण्याचे आवाहन केले. आता इथे आपल्या उमेदवाराचे नाव वाघचौरे आहे. लोक कोंबड्या चोरतात, पक्ष चोरतात, चिन्ह चोरतात एवढेच नाही तर काका व बापही चोरतात, असे भिंगे म्हणाले.

यशपाल भिंगे यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. मोदी हे गारुडी आहेत. माणसे जमा करतात आणि बोलत राहतात. ते चालते कसे तेही बघा.. ( मोदींची नक्कल करत टीका ) अरे काय नाइंटी मारून येतोस... का गावगुंड आहेस, असे भिंगे म्हणाले.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS
OPEN 2024-25
प्रवेश सुरू
२०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# घागर दर्शनासाठी उसळला लाखोंचा भक्तीसागर

## देवीच्या जयजयकाराच्या घोषणांनी आसमंत दणाणला
## शुक्रवारी नामवंत मल्लांच्या कुस्त्यांचा आखाडा



**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेसाठी लाखोंचा जनसमुदाय उपस्थित होता. गुरुवार दि.२ मे रोजी सकाळी सात वाजता निघोज ग्रामस्थ व लाखो भाविक मळगंगा देवीचे दर्शन घेऊन व पालखी घेऊन सकाळी सात वाजता देवीच्या हेमाडपंथी बारवेकडे पालखी घेऊन गेले. त्याठिकाणी मानकरी तसेच देवीचे पुजारी गायखे बंधू यांच्या हस्ते देवीच्या श्रींची घागरीची विधीवत पूजा केली. त्यानंतर मिरवणूकीत सहभागी होणाऱ्या लाखो भाविकांनी मळगंगा देवीच्या जयजयकाराच्या घोषणा देत आसमंत दणाणून टाकला.**

राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची घागर मिरवणूक हा एक अद्धितीय सोहळा पाहण्यासाठी व घागर माध्यमातून देवीचे प्रत्यक्ष दर्शन होत असल्याचा भाविकांची श्रद्धा आहे गेली शेकडो वर्षांपासून ही श्रद्धा परंपरा जतन करण्याचे भावीक मोठ्या उत्साहात करीत आहेत. सकाळी साडेसात वाजता देवीच्या श्रीं ची घागर मिरवणूक बादवे पासून सुरू झाली वाजत गाजत निघालेल्या या मिरवणुकीत महिला भगिणींचा सहभाग मोठ्या संख्येने होता. शेकडो महिला पितळी तसेच इतर धातूच्या कळशा घेऊन या घागर मिरवणूकीच्या मागे देवीचे भक्तीमय गाणे म्हणत तसेच देवीचा जयजयकार करीत मोठया श्रद्धेने सहभागी झाल्या होत्या. यावेळी ही मिरवणूक जुनी पेठेच्या मागील पेठेतून मळगंगा मंदीरा पर्यंत आल्यानंतर देवीच्या मंदीराबाहेर देवीच्या पुजारी रुपालीताई गायखे यांच्या हस्ते घागरीचे औक्षण करण्यात आले या ठिकाणी पुजारी गायखे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली.

यावेळी लाखो भाविकांनी देवीचा जयजयकार करीत टाळ्यांचा कडकडाट करीत माता मळगंगा देवीचा साक्षात्काररुपी घागरीचे जोरदार स्वागत केले. त्यानंतर हीच मिरवणूक मुख्य पेठेतून ग्रामपंचायत चौक मार्गे पुन्हा देवीच्या बारवेजवळ आली. ही मिरवणूक सुरू असताना मुख्य पेठेतील प्रत्येक घरावर देवी दर्शनासाठी हजारो भाविक उभे होते. मुख्य पेठेतील गर्दी लक्षात घेता हेच हजारो भाविक घराच्या माळजावर तसेच गॅलरीत सकाळी सातपासून घागर दर्शनाची प्रतिक्षा करीत असतात.हेच भाविक श्रद्धेने देवी घागरीचे दर्शन घेत फुलांचा व रेवड्यांचा मिरवणूकीवर वर्षाव करीत देवीचा जयजयकार करीत श्रद्धा व्यक्त करतात.

दुपारी चार वाजता देवीच्या ८५ फूट उंचीची काठी तसेच पालखीची मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक सायंकाळी जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड या ठिकाणी असलेल्या मळगंगा मंदीराच्या शिखराला लागल्यानंतर या ठिकाणी कुंडाची यात्रा सुरू झाली. ही यात्रा शेतीचे औजारे व साहित्य तसेच खेळणी व मिठाई साठी अतिशय प्रसिद्ध आहे. गुरुवार व शुक्रवार या दोन दिवसात लाखोंची उलाढाल या ठिकाणी होत असते.

शुक्रवार दि.३ मे रोजी दुपारी चार वाजता नामवंत पैलवानांचा कुस्त्यांचा हगामा याठिकाणी होत असून निघोज ग्रामस्थांच्या वतीने लाखो रुपयांची बक्षिसे नामंकीत पैलवानांना देण्यात येणार आहे. या कुस्ती हगाम्याने कुंड यात्रेची सांगता होत असते. बुधवार दि. १ रोजी सुरू झालेली यात्रा शुक्रवार दि.३ पर्यंत मोठ्या उत्साहात सुरु असते किमान तीन दिवसांत चार ते पाच लाग भाविक दर्शनासाठी येत असतात यावर्षी सुद्धा मोठी गर्दी झाल्याने सहा लाखांपेक्षा जास्त भाविक आले होते.

# भूमिपुत्रच्या जिल्हा बैठकीत दोन्ही आघाड्यांवर नाराजीचा सूर

## पाण्याच्या प्रश्नावर ठोस आश्वासन देणाऱ्याच्या पाठीमागे जाणार
## बैठकीत संतोष वाडेकर यांची भूमिका स्पष्ट

**नगर : प्रतिनिधी**

**सध्या देशात लोकसभेच्या निवडणुका लागल्या आहेत. राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न प्रखरपणे मांडणारी भूमिपुत्र शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका स्पष्ट करण्यासाठी अहमदनगर येथे मंगळवारी दि. ३० एप्रिल रोजी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी राहुरी, संगमनेर, श्रीरामपूर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, कर्जत, श्रीगोंदा व पारनेर या भागातून मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.सध्याचे केंद्र सरकार व राज्य सरकार शेतकरी कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देत नाही. अशी भूमिका यावेळी पदाधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये मांडली.**



संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर म्हणाले सध्या लोकसभा निवडणुका सुरू आहेत शेतकरी हितासाठी जे काम करतील आणि त्यासंदर्भात आपल्याला ठोस आश्वासन देतील अशा उमेदवारा सोबत आपण जाण्याची भूमिका घेणे गरजेचे आहे नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर आहे अनेक दिवसांपासून या प्रश्नांवर निवडणुकांमध्ये राजकारण केले जाते. शेतकऱ्यांना नेहमीच कृषी प्रश्नांवर झुलवत ठेवले आहे त्यामुळे यापुढील काळात शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या लोकांसोबत संघटना असेल असे ते यावेळी म्हणाले.

वाडेकर पुढे बोलताना म्हणाले पाण्याचा प्रश्न हा नगर दक्षिणचा गंभीर आहे. शेजारच्या जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये आज पाणीच पाणी आहे. परंतु नगर दक्षिण मध्ये दुष्काळी परिस्थिती सध्या तीव्र आहे. पाण्याच्या प्रश्नावर जो उमेदवार ठोस निर्णय देईल आणि तो प्रश्न सोडवण्यासाठी शासन दरबारी पहिल्या दिवसापासून प्रयत्न करेल अशा उमेदवाराबरोबर आम्ही जाणार आहोत असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अहमदनगर येथे बैठकीसाठी प्रदेश उपाध्यक्ष अशिफ शेख, राज्य संपर्कप्रमुख अशोक आंधळे, जिल्हा संघटक संतोष वाबळे, पाथर्डी तालुकाध्यक्ष गणेश सुपेकर, शेवगाव तालुका समन्वयक संदीप राजळे, नेवासा तालुकाध्यक्ष महेश धाडगे, कर्जत जामखेड तालुका समन्वयक हनुमंत पावणे महाराज, राहुरी तालुकाध्यक्ष सागर भिंगारे, नगर शहर अध्यक्ष कर्डिले, पारनेर तालुका सचिव नंदू साळवे, प्रवीण खोडदे, सुभाष पाटील करंजुले, साईनाथ घोरपडे, संगमनेर तालुकाध्यक्ष संदीप शिंदे, तालुका संघटक सतीश तनपुरे, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब वाळुंज, पारनेर तालुका कार्याध्यक्ष संजय भोर, नारायण रोकडे, अण्णा सोबले, संतोष गागरे, सतीश भनगडे, विश्वनाथ वाघ, मंजाबापू वाडेकर, नंदन भोर, तेजस भोर, दादू जांभुळकर, शिवाजी तांबे, शिवाजी चिकणे, चांद भाई शेख, ज्ञानेश्वर गायकवाड, रामभाऊ तुवर, रावसाहेब पवार यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी विद्यापीठाच्या मैदानावर रंगली जिल्हास्तरीय स्पर्धा

## ३०० खेळाडूंचा सहभाग; स्पर्धेतील विजेत्यांची राज्य स्पर्धेसाठी निवड



**सुपा : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय वरिष्ठ गट मैदानी स्पर्धा राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मैदानावर उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत मुलांमध्ये निखिल आव्हाड, ज्ञानेश्वर काळे, किशोर मरकड तर मुलींमध्ये उषा गुढीपाटी, ईश्वरी दराडे, विश्वेषा मिस्कीन व कोमल बनकर यांनी विविध गटात विजय मिळवला आहे. या स्पर्धेतील विजेत्यांची राज्य स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे.**

या स्पर्धेचे उद्घाटन संघटनेचे सुनील जाधव व राजेंद्र कोतकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले. या स्पर्धेमध्ये संपूर्ण जिल्ह्यामधून ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेसाठी पंच म्हणून रमेश वाघमारे, संदीप घावटे, जगन गवांदे, श्रीरामसेतू आवारी, समीर शेख, अमित चव्हाण, गुलजार शेख, शिल्पा म्हात्रे, राघवेंद्र धनलगडे, सुजित बाबर, जिल्हा संघटनेचे सचिव दिनेश भालेराव यांनी काम पाहिले.

या स्पर्धेमधील प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूंची नागपूर येथे १ ते ३ जून दरम्यान होणाऱ्या राज्य स्पर्धे साठी निवड करण्यात आलेली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीर सिंग चौहान व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी यांनी मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

अहमदनगर जिल्हा वरिष्ठ गट मैदानी स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे- (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय) पुरुष गट १०० मीटर धावणे- निखिल आव्हाड, शिवम लगड, गणेश गाढवे, २०० मीटर धावणे- निखिल आव्हाड, ज्ञानेश्वर काळे, ऋषिकेश कर्डिले, ४०० मीटर धावणे - ज्ञानेश्वर काळे, ओमकार दहिफळे, निखिल माऊलकर, ८०० मीटर धावणे- शेखर लंके, निलेश बोराडे, विशाल गायकवाड, १५०० मीटर धावणे- प्रवीण राऊत, कृष्णा गायके, आकाश शिंदे, ५००० मीटर धावणे- सागर सदगीर, प्रवीण राऊत, प्रसाद गव्हाणे, २० किलोमीटर चालणे- सुनील हापसे, गौरव रसाने, निखिल सलालकर, ३००० मीटर ट्रिपल चेस- किशोर मरकड, प्रसाद गव्हाणे, सम्यक राजगुरू, गोळा फेक- समर्थ सकट, रुपेश धनलगडे, सौरभ कदम, भाला फेक-ऋषी कुर्हे, गौतम गीते, ऋषिकेश, थाळी फेक- श्रीनिवास कराळे, ऋषिकेश धनलगडे, उपेश धनलगडे, लांब उडी- दहिफळे जगदीश, बोरुडे सोहम, अष्टेकर अनंता, तिहेरी उडी- बोरुडे सोहम, आव्हाड सोहम, गौरव मढवई. महिला १०० मीटर धावणे- उषा गुढीपाटी, निकिता दवणे, ईश्वरी दरोडे, २०० मीटर धावणे- ईश्वरी दरोडे, ऋतुजा फलके, पुनम धोत्रे, ४०० मीटर धावणे- उषा गुडीपाटी, सानिका शिंदे, आरती कोलते, ८०० मीटर धावणे- वर्षा धानापुणे, कोमल सापते, वैष्णवी शिंदे, १५०० मीटर धावणे- सुवर्णा शिरसाट, संयुक्त गारदे, आरती कोलते, ५००० मीटर धावणे- डांगे गायत्री, शिरसाट सुवर्णा, संयुक्ता गारदे, २० किमी चालणे- वैष्णवी खेडकर, कोमल शिरसाठ, गोळा फेक- विश्वेषा मिस्किन, निकिता दवणे, गीता जाधव, भालाफेक- नेहा मोरे, साक्षी मोरे, माधुरी कदम, थाळीफेक- विश्वेषा मिस्किन, आलिशा निकाळे, लांब उडी- बनकर कोमल, पवार प्राजक्ता, डोंगरे साक्षी, तिहेरी उडी- बनकर कोमल, पवार प्राजक्ता, डोंगरे साक्षी.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यास सक्षम

## सिताराम खिलारी यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने शिक्षणाचा विस्तार झाला. महात्मा फुले, महर्षी कर्वे, आगरकर यांनी देशाच्या शिक्षणाच्या पायाभरणीत मोलाचे योगदान दिले. असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवसीय विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते या व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर हे होते.

संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पुढे म्हणाले, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था सुरू झाली. या संस्थेने अहमदनगर जिल्ह्यात शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने शिक्षणाचा विस्तार झाला आहे. आतापर्यंत आपल्याला मिळणारे शिक्षण हे पारंपरिक स्वरूपाचे आहे. या शिक्षणाला व्यावसायिकतेची जोड देणे ही काळाची गरज आहे. सध्या वाचनसंस्कृती लोक पावत चालली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञान संपादन करण्यासाठी जसे कष्ट घेतले ती प्रेरणा घेऊन आजच्या युवकाने ज्ञानार्जन केलं पाहिजे.



याप्रसंगी प्राचार्य लक्ष्मणराव मतकर म्हणाले, सध्याच्या पारंपरिक शिक्षणापेक्षा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे व्यवसाय व रोजगार क्षमता विकसित करणारे आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी झाली तरच या धोरणाचा हेतू साध्य होईल. म्हणून, महाविद्यालयाने तीन दिवसीय विशेष व्याख्यानमालेचे आयोजन केलेले आहे. या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करावी याचे मार्गदर्शन मिळणार आहे.

या व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प डॉ. अनंत हरकल यांनी गुंफले त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पदवी अभ्यासक्रमाचे स्वरुप कसे असेल यासंबंधी मार्गदर्शन केले. तर डॉ श्रीहरी पिंगळे यांनी शैक्षणिक धोरणाची बलस्थाने यासंबंधी मार्गदर्शन केले. तर उपप्राचार्य डॉ अनिल आठरे यांनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंतच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेतला आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशा पद्धतीने होणार आहे यासंबंधी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ तुकाराम थोपटे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समन्वयक प्रा. नितीन निपुंगे आदी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला बचत गटांसाठी विखेंचे महत्वपूर्ण योगदान

## ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील महिला बचत गट सक्षम होण्यासाठी तसेच महिला भगिनी स्वयंपूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील व धनश्रीताई विखे पाटील यांचे फार मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन निघोज ग्रामपंचायतच्या कार्यक्षम सदस्या शबनूर इनामदार यांनी व्यक्त केले.**



राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेतील भाविकांसाठी तेजस्विनी महिला बचत गट व मळगंगा महिला बचत गटाने मंदीरासमोरील आवारात लस्सी, थंड पाणी तसेच थंडपेय तसेच नाष्टा व उपवासाच्या पदार्थांचे स्टॉल सुरू केले असून इनामदार व त्यांच्या सहकारी महिला भगीनींनी या स्टॉलला भेट दिली यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी सोनाली वराळ, ज्योत्स्ना लोढा, शैला खराडे, निशा लंके, शारदा ऊर्फ गया तुपे, पुष्पा भोसले, संध्या गायखे, सारिका गायखे, रुपाली गायखे, तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे, मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई पवार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. ग्रामपंचायत सदस्या इनामदार यावेळी म्हणाल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ.सुजय विखे पाटील तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, धनश्रीताई विखे पाटील यांनी जिल्ह्यातील महिला बचत गट सक्षम होण्यासाठी गेली पाच वर्षात मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. शासनाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी योजनांची सर्वाधिक अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यात झाली आहे. तेजस्विनी महिला बचत गट तसेच मळगंगा महिला बचत गट माध्यमातून राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेसाठी हे स्टॉल सुरू करुण भावीकांना थंड पेय तसेच उपवासाचे पदार्थ व नाष्टा स्वस्त दरात उपलब्ध होणार आहे. हे दोन्ही महिला बचत गट तसेच निघोज व परिसरातील शेकडो महिला बचत गट अतिशय सक्षम व कार्यक्षमपणे सेवाभाव करीत असून त्यांना विखे पाटील कुटुंबीयाने मोठा आधार व पाठबळ दिले असल्याने निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटातील हजारो महिला स्वयंपुर्ण झाल्या आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई पवार यांनी केले शेवटी तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे यांनी आभार मानले.

# खा. डॉ. सुजय विखे पुन्हा शेतकऱ्यांच्या रोषाचे धनी!

## कांदा व दुध दरावरून निमगांव गांगर्डा येथे शेतकरी संतप्त
## सुजय पर्व गाणे सुरू होताच शेतकऱ्यांकडून जाब विचारण्यास प्रारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

**पाच वर्षापूर्वी झालेल्या निवडणूकीनंतर थेट दुसऱ्या निवडणूकीसाठी मत मागण्यासाठी कर्जत तालुक्यातील निमगांव गांगर्डा येथे खा. डॉ. सुजय विखे हे बुधवारी सकाळी पोहचले असता त्यांना संतप्त शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले.शेतकऱ्यांची आक्रमकता पाहून विखे यांच्यावर तिथून काढता पाय घेण्याची नामुश्की ओढवली.**



लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने खा. डॉ. सुजय विखे यांचा बुधवारी कर्जत तालुका दौरा होता. डॉ. विखे यांच्या दौऱ्यामध्ये निमगांव गांगर्डाचा समावेश नव्हता, मात्र बुधवारी निमगांव गांगर्डा येथील ग्रामदैवत कालभैरवनाथांचा यात्रोत्सव होता. यात्रोत्सवानिमित्त हजारो भाविकांची गर्दी होणार असल्याने तिच संधी साधून डॉ. विखे हे त्यांचा ताफा घेउन निमगांव गांगर्डा येथे पोहचले. मंदिरात जात दर्शन घेउन परतत असताना ताफ्यातील वाहनामध्ये सुजयपर्व हे गाणे लावण्यात आले. तिथूनच शेतकऱ्यांच्या रोषाला सुरूवात झाली.

विखे यांनी पाच वर्षात गावाकडे लक्ष दिले नाही. एकही विकास काम केले नाही. दुध, कांद्याचे दर कोसळलेले असताना त्याविरोधात संसदेत आवाज उठविला नाही. त्यामुळे निवडणूक सुरू झाल्यावर मते मागण्यासाठी त्यांनी गावात येण्याचे कारणच काय असा सवाल शेतकऱ्यांकडून करण्यात येत होता.

दरम्यान, गाभाऱ्यातून दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर शेतकऱ्यांच्या जमावामध्ये डॉ. विखे आले. मोठा आरडा ओरडा सुरू झाल्यानंतर डॉ. विखे यांच्या अंगरक्षकाने विखे यांच्या भोवती जमलेल्या तरूणांना दुर केले. त्यानंतर डॉ. विखे हे तिथून निघून गेले.

# मळगंगा देवीची यात्रेला उत्साहात सुरुवात

## बगाडगाड्याच्या मिरवणूकीचा शेकडो महिलांनी घेतला आनंद

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची यात्रा उत्साहात सुरुवात झाली असून नवसपुर्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या बगाडगाड्याच्या मिरवणूकीचा घेतला शेकडो महिलांनी आनंद घेतला असून हजारो भाविकांनी मळगंगा देवीचा जयजयकार करीत बगाडगाडा मिरवणूकीची शोभा वाढवली.**

शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात बुधवार दि.१ मे पासून सुरू झाला. पहाटे तीन ते पाच वाजेपर्यंत पुजारी गायखे कुटुंबांनी देवीची विधिवत पूजा केली. त्यानंतर संबळ वाद्यासहीत दुणगुले कुटुंबाने महाआरती केली. त्यानंतर अभिषेक करण्यात आला. पहाटे सहा पासून भाविकांनी देवी दर्शनासाठी गर्दी केली होती मंदिरामध्ये दर्शन रांगेची व्यवस्था मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट व ग्रामस्थ तसेच मुंबईकर मंडळ यांनी केल्याने भाविकांना व्यवस्थीत मनोभावे देवीचे दर्शन घेता आले.

पहाटे सहा ते सायंकाळी सातपर्यंत पंचवीस हजार पेक्षा जास्त भाविकांनी दर्शन घेतल्याची नोंद झाली आहे.



यावेळी असंख्य भाविकांनी गुप्तदान तसेच देणगी पावतीच्या माध्यमातून पन्नास रुपये ते पंचवीस हजार रुपये देणगी दिल्या आहेत. यात्रेच्या निमित्ताने पहिल्याच दिवशी लाखो रुपये देणगी देत मळगंगा देवीसाठी श्रद्धा व्यक्त केली आहे. दुपारी पाच वाजता मळगंगा मंदीरापासून बगाडगाड्याची मिरवणूक काढण्यात आली. निघोज येथील जय मल्हार देवस्थान ट्रस्टच्या लंके मंडळाला या बगाडगाड्याचा मान असून देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष पोपटराव लंके, सर्व पदाधिकारी तसेच ट्रस्टचे मार्गदर्शक बाबाजी आणणा लंके, पांडाभाऊ लंके व ट्रस्ट सचिव सचिन लंके यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली या बगाडगाड्याचे मिरवणुकीचे नियोजन करण्यात येते.लंके मंडळाचे शेकडो युवक व ज्येष्ठ मंडळी या बगाडगाडा मिरवणूकीचे नियोजन करण्यासाठी परिश्रम घेत असतात.

मळगंगा मंदिर ते ग्रामपंचायत चौक तसेच देवीची हेमांडपंथी बारव अशाप्रकारे बगाडगाड्याची मिरवणूक काढण्यात आली यावेळी शेकडो महिलांनी बगाडगाड्यात बसून नवसपुर्तीचा आनंद घेतला. किमान पन्नास हजार पेक्षा जास्त भाविकांची यावेळी उपस्थिती होती. बारवेजवळ मिरवणूक आल्यानंतर देवीला अंबीलचा नैवेद्य दाखवण्यात आला या ठिकाणी या मिरवणूकीची सांगता करण्यात आली. त्यानंतर एस टी बसस्थानक परिसरातील मळगंगा चित्रमंदिर परिसरातील प्रांगणात ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ व भावीक यांच्या लोकसहभागातून लाखो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. बुधवार दि.१ मे रोजी सुरू झालेला यात्रा उत्सव चार दिवस सुरु असतो. सर्वाधिक गर्दीचा उच्चांक गुरुवार दि. २ रोजी सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत देवीच्या श्रीं ची घागर मिरवणूकीत लाखो भाविक सहभागी होतात किमान पाच ते सहा लाख भाविक दर्शनासाठी यावेळी उपस्थित असतात.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com